'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार'
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

(स्वायत्त) कोल्हापूर
NAAC Accredited "A" with CGPA - 3.24 in 3rd cycle, 58th Rank in India Ranking 2017, by NIRF (MHRD)

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित,

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त)



# विवेकNEWS

• प्रबंध संपादक
प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार
• कार्यकारी संपादक डॉ. प्रदीप पाटील
डॉ. स्वप्निल बुचडे
श्री. सदानंद दुर्गुळे
• सहाय्यक संपादक

| | |
|---|---|
| गुलनाज पठाण | बी. ए. २ |
| प्रणव पाटील | बी. ए. २ |
| संग्राम राठोड | बी. ए. ३ |
| कोमल पाटील | बी. ए. ३ |
| सानिका नाकिल | बी. ए. ३ |
| प्रतिक्षा पोवार | बी. ए. ३ |
| प्रज्ञा पाटील | बी. ए. ३ |

वर्ष : १० | अंक : २१ | जानेवारी, २०२४ | पाने चार | पान नं. १ | स्वागत मूल्य : १ रुपया

## विवेकानंदमध्ये 'आरोग्य दिन' विविध उपक्रमांनी साजरा



वायू प्रदूषणाची मर्यादा ओलांडली जात असून नव्वद टक्के प्रदूषण केवळ माणसामुळे होते. जागतिक तापमानवाढीचा दिवसेंदिवस आरोग्यावर परिणाम होत आहे. विकासाबरोबर मानवी आरोग्य राखणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन सांगली मधील छातीरोग विशेष तज्ज्ञ डॉ. अनिल मडके यांनी 'श्वासगणिक धोका ; वेळीच ओळखा' या विषयावर बोलताना केले. ते श्री स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहानिमित्त आयोजित आरोग्य दिन समारंभात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे होते.

अध्यक्षीय मनोगतात संस्थेचे कार्याध्यक्ष मा.प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, निसर्गाशी एकरुप होऊन आनंदी बनावे आणि आयुष्य वाढवावे. प्रत्येक गुरुदेव कार्यकर्त्यांनी आपल्याकडील चांगले विचारधन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून संस्थेचा नावलौकिक वाढवावा. ज्ञानाची उपभोगिता वाढायला हवी.

यावेळी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कौस्तुभ गावडे, आजीव सेवक व विद्यासमिती प्रमुख श्री. श्रीराम साळुंखे यांनी मनोगते मांडली. संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा वाढदिवस संस्थेच्या सर्व शाखांमध्ये आरोग्य दिन आणि ज्ञानशिदोरी हे उपक्रम साजरे केले जातात. त्याअंतर्गत महाविद्यालयात रक्तदान शिबीर, नेत्र तपासणी, आरोग्य तपासणी हे सुध्दा उपक्रम राबविण्यात आले.

## विवेकानंदमध्ये 'कर्करोगाची लक्षणे व प्रतिबंधात्मक उपाय' या विषयावर प्राध्यापक प्रबोधिनी व्याख्यान संपन्न



कॅन्सर या आजाराची पकड खेकडयाच्या नांग्याप्रमाणे मजबूत असते. कॅन्सर हा आजार अलीकडील काळातील नसून फार जुना आजार आहे. जगाचा विचार करता भारतात कॅन्सरचे प्रमाण झपाटयाने वाढत आहे. कॅन्सरचे विविध प्रकार असून यावर मात करण्यासाठी भाज्या मिठाच्या पाण्यात धुऊन खाणे, मानसिक ताण, तणाव कमी करणे, चांगल्या जीवनशैलीचे आचरण करणे यासारख्या गोष्टी महत्वाच्या असतात. कॅन्सरच्या विरोधात एकत्रितपणे लढा उभारण्याची गरज आहे, असे प्रतिपादन सांगोला महाविद्यालयाचे प्रा. डॉ. प्रकाश बनसोडे यांनी केले. ते विवेकानंद मधील प्राध्यापक प्रबोधिनी आयोजित 'कर्करोगाची लक्षणे व प्रतिबंधात्मक उपाय' या विषयावर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील गणित विभाग प्रमुख डॉ.एस.पी. थोरात होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाची सुरवात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे रचित संस्था प्रार्थनेने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक प्रबोधिनी प्रमुख डॉ. आळवेकर यांनी केले.

## डॉ. प्रीती रमेश कुंभार आंतरराष्ट्रीय लघुचित्रपट महोत्सवात उत्कृष्ठ अभिनेत्री पुरस्काराने सन्मानित



चेन्नई येथे संपन्न झालेल्या आंतरराष्ट्रीय लघुचित्रपट महोत्सवामध्ये विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांची कन्या डॉ. प्रीती कुंभार हिने पटकथा लेखन, दिग्दर्शन व भूमिका केलेल्या संस्कृतमधील 'अग्निकण' या लघुचित्रपटासाठी प्रीतीला उत्कृष्ठ अभिनेत्रीचा पुरस्कार भारत सरकारचे सुचना प्रसारण राज्यमंत्री डॉ.एल.मुरुगन, संस्कृत भारतीचे श्रीमान सत्यनारायण भट यांच्या उपस्थितीत सुप्रसिध्द अभिनेते व दिग्दर्शक विवेक अग्नीहोत्री यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

भारत सरकारच्या संस्कृत भारती संस्थेच्या वतीने भारतीय संस्कृत भाषेच्या संवर्धनासाठी चेन्नई येथे आंतरराष्ट्रीय लघुचित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. देशभरातील विविध राज्यातील हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. महाराष्ट्रातून प्रीती कुंभार हिने लेखन, दिग्दर्शन व अभिनय अशा तिहेरी भूमिकेत सहभाग घेतला होता. या अग्निकण लघुचित्र-पटाला या आंतरराष्ट्रीय लघुचित्रपट महोत्सवात तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे.

## विवेकानंद कॉलेजमध्ये मराठी विश्वकोश नोंदलेखन कार्यशाळा संपन्न



पुस्तकं ही दीपस्तंभाप्रमाणे काम करीत असतात. कोश वाङ्‌मय हा महत्त्वाचा दस्ताऐवज आहे. शब्दांच्या निर्मितीमागे संस्कृतीच्या खुणा साठवलेल्या असतात. कोश वाङ्‌मयाची निर्मिती करीत असताना आणि नोंदी लिहीत असताना त्यामध्ये वस्तुनिष्ठता आणि अद्ययावतपणा असायला हवा, असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. ते विवेकानंद कॉलेजमधील मराठी विभाग आणि महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी विश्वकोश नोंद लेखन कार्यशाळेत बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे होते.

अध्यक्षीय मनोगत मांडताना मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे आणि विश्वकोशाचे जनक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे ऋणानुबंध होते. विश्वकोश मंडळातील सदस्यांची बापूजी सतत अभ्यासपूर्ण चर्चा करीत असत. ज्ञानाची वृद्धी व्हायची असेल तर वाचनाचा ध्यास घेतला पाहिजे. जगाचे ज्ञान विश्वकोश माध्यमातून उपलब्ध होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी विश्वकोशामध्ये योगदान देणे गरजेचे आहे, असे मत मांडले. कार्यशाळेच्या सत्रांमध्ये वाङ्मयकोशाचे विद्यावासंगी सहाय्यक श्री. सरोजकुमार मिठारी यांनी विश्वकोश परिचय करून देऊन संकेतस्थळ सादरीकरण केले तर शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी साहित्य आणि समाज माध्यमातील मराठी या विषयावर मार्गदर्शन केले. समारोप सत्रांमध्ये संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या सौ. शुभांगी गावडे यांच्या हस्ते सहभागी विद्यार्थी आणि प्राध्यापकांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात शिक्षण-महर्षी डॉ. बापूजी साळुंखे रचित संस्थाप्रार्थनेने झाली. यावेळी मराठी विश्वकोश गीत आणि महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित यांच्या शुभेच्छा संदेशाची चित्रफीत दाखविण्यात आली. कार्यशाळेच्या सत्रांमध्ये कार्यशाळेचे समन्वयक प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर आणि प्रा. गीतांजली साळुंखे यांनी प्रास्ताविक व स्वागत केले तर आभार प्रा. डॉ. कैलास पाटील, डॉ. प्रदीप पाटील, डॉ. स्वप्नील बुचडे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील यांनी केले. कार्यशाळेसाठी विविध महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सवात सलग १५ वर्षे विवेकानंद कॉलेज अव्वल



दहिवडी, जि.सातारा येथे संपन्न झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या ४३ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेजने विविध १५ कला प्रकारात पुरस्कार प्राप्त करून शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सवात अव्वल येण्याचा बहुमान पटकावला. यामध्ये अभिजीतदादा कदम सांघिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशीप फिरता चषक, संगीत विभाग फिरता गौरव चषक, नाट्यविभाग फिरता गौरव चषक मिळविण्याचा बहुमानही पटकावला. या युवा महोत्सवात शास्त्रीय नृत्य (प्रथम), एकपात्री अभिनय (तृतीय), पाश्चिमात्य् एकल गायन (प्रथम) शास्त्रीय सूरवाद्य (तृतीय), पाश्चिमात्य एकल वादन (व्दितीय), स्थळ छायाचित्रण (प्रथम), व्यंगचित्र (तृतीय), हिंदी वक्तृत्व (द्वितीय), लोककला (तृतीय), एकांकिका (तृतीय), सर्वोत्कृष्ठ स्त्री अभिनय एकांकिका (प्रथम) लघुनाटिका (प्रथम), पथनाट्य (प्रथम), भारतीय समुहगीत (प्रथम) लोकसंगीत वाद्यवृंद (प्रथम), प्रश्नमंजुषा (द्वितीय) या कलाप्रकारात पारितोषिके प्राप्त झाली.

## विवेकानंदमध्ये एन.एस.एस.चें उद्घाटन



शिक्षणातून समाजसेवा आणि समाजसेवेतून शिक्षण हे एन.एस.एस. चे ध्येय आहे. ज्या समाजात आपण राहतो तो समाज समजून घेणे आणि समाजाबरोबरच स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे हे एन.एस.एस.चे उद्दिष्ट आहे. एन.एस.एस.च्या माध्यमातून मानसिक, बौध्दिक, सामाजिक विकास होतो. विद्यार्थ्यांमधील नेतृत्व गुण, व्यवस्थापन आणि नियोजन कौशल्य विकसीत होते. सामंजस्य, धाडस, सातत्य आणि आत्मविश्वास या गुणांचा विकास एन.एस.एस. मुळे होतो. एन.एस.एस. च्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी समाजसेवा पर्यायाने देशसेवा करावी असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे रा. से. योजनेचे संचालक डॉ. टी. एम. चौगले यांनी केले. ते विवेकानंद कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर. आर.कुंभार होते.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. आर.आर.कुंभार यांनी एन.एस.एस. च्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये स्वयंशिस्त निर्माण् होते. माणसाला माणसाशी माणसासारखे जगायला एनएसएस शिकवते तसेच सामाजिक उपक्रम राबवून आधुनिक काळात सुसंस्कारीत पिढी घडविण्याचे मोलाचे काम होत आहे. तसेच श्रमाची प्रतिष्ठा जपल्यामुळे शिस्त, स्वावलंबन इत्यादीमुळे बलवान राष्ट्राची निर्मिती युवा शक्तीद्वारे केली जाते. तसेच जाती धर्म, भेदभाव न मानता आम्ही भारतीय एक आहोत ही ऐक्याची भावना निर्माण होते, असे मत मांडले.

## सैनिकांच्या त्यागामुळेच देश आज आत्मनिर्भर बनवण्याच्या दिशेने – ब्रिगेडियर सीडीपी थोरात



दिनांक १६ डिसेंबर १९७१ रोजी भारतीय सैन्याने बजावलेली कामगिरी अजरामर आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील हा सर्वात मोठा विजय एक सक्षम राष्ट्र निर्मिती पाया घालणारा होता. आंतरराष्ट्रीय पातळीवर या विजयाच्या पराक्रमाने एक मजबूत राष्ट्र म्हणून ओळख निर्माण झाली. पश्चिम पाकिस्तानाच्या जोखडातून पूर्व पाकिस्तान स्वतंत्र करून बांगलादेश देशाची निर्मिती सैन्याच्या विजयानी केली. असे मत निवृत्त ब्रिगेडियर सीडीपी थोरात यांनी सन्मान सोहळयाच्या प्रसंगी मांडले. सैनिकांचे मनोबल वाढविण्यासाठी युद्ध भूमीवर लढलेल्या सैनिकांचा सन्मान होणे ही सदृढ समाजाच्या निर्मितीसाठी अत्यंत गरजेची गोष्ट आहे. असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर आर कुंभार यांनी अध्यक्षीय मनोगतात मांडले. जिल्हा सैनिक कल्याण फेडरेशन आणि विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने १९७१ भारत पाकिस्तान युद्धातील सहभागी अधिकारी आणि सैनिकांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. सदरच्या कार्यक्रमात ५० युद्धसहभागी सैनिकांना मानवंदना देऊन सत्कार करण्यात आला.

विवेकNEWS

जानेवारी, २०२४

## संपादकीय... भारतीय अवकाश संशोधनाचा इतिहास

विसाव्या शतकाच्या काळात जगभरामध्ये अनेक गोष्टी घडू लागल्या. अमेरिका आणि सोव्हिअत युनिअन या दोन राष्ट्रांमध्ये शीतयुद्ध सुरू होते. दोन राष्ट्रांनी देशाच्या विकासासाठी तंत्रज्ञानामध्ये बरीच प्रगती केली. या युद्धात दोन राष्ट्रांमध्ये अंतराळ संशोधनाची शर्यत सुरु होती. यादरम्यान १९५७ साली सोव्हिअत युनियनने जगातील पहिला कृत्रिम उपग्रह स्पुटनिक-१ (Sputnik-1) यशस्वीरित्या अवकाशात प्रक्षेपित केला.

भारत त्या काळात आर्थिकरित्या कमजोर देश होता. देशाच्या प्रगतीसाठी तंत्रज्ञानाचे महत्व भारताला समजू लागले. विज्ञान, तंत्रज्ञान व अवकाश संशोधनाकडे देशाचा कल होता. १९५८ साली पंडित नेहरूंनी अंतराळ संशोधनाची जबाबदारी भारतीय अणुऊर्जा विभागाला सोपविली. वरिष्ठ भौतिकशास्त्रज्ञ डॉ. होमी जहांगीर भाभा हे तत्कालिन अणुऊर्जा विभागाचे विभागप्रमुख होते. त्यांनी १९६२ साली (Indian National Committee For Space Research - INCOSPR) भारतीय अंतराळ संशोधन समितीची स्थापना केली. भारताचे भौतिक व खगोलशास्त्रज्ञ डॉ. विक्रम अंबालाल साराभाई यांच्या अध्यक्षतेखाली आपला देश अवकाश संशोधनाचे कार्य करत होता. त्या काळात भारताजवळ अवकाश संशोधनासाठी कोणत्याही पायाभूत सुविधा नव्हत्या. यादरम्यानच भारत १९६२ सालच्या भारत-चीनच्या भयंकर युद्धातून सावरत होता आणि तसेच अन्नटंचाईचा सामना करत होता. याच काळात भुकेने व्याकूळ असलेला भारत एका प्रगत देशाचे, तंत्रज्ञानाने विकसित राष्ट्राचे स्वप्न पाहू लागला. हीच महत्त्वाकांक्षा घेऊन हळूहळू भारत नवनवीन तंत्रज्ञान अवगत करू लागला, शिकू लागला. भारताने सुरुवातीच्या काळात साधे अग्निबाण (Sounding Rockets) तयार केले. चाचणीसाठी अनेक रॉकेट आकाशात सोडले गेले. हळूहळू यामध्ये अमुलाग्र सुधारणा होत गेल्या. रॉकेटचे विविध पार्ट एका ठिकाणावरून दुसरीकडे नेण्यासाठी सायकल, बैलगाडीचा वापर शास्त्रज्ञ करत असत. १९६३ साली केरळ येथे थुंबा रॉकेट लॉन्च स्टेशन उभारण्यात आले. तसेच डॉ. विक्रम साराभाई यांनी कृत्रिम उपग्रह निर्मिती आणि प्रक्षेपण संशोधनासाठी थुंबा येथे (SSTC-Space Science Technology Center) अंतराळ विज्ञान व तंत्रज्ञान केंद्राची स्थापना केली. रॉकेट निर्मितीमध्ये भारताची प्रगती होत गेली. भारताला आता स्वनिर्मित कृत्रिम उपग्रह अवकाशात प्रक्षेपित करण्यासाठीचे तंत्रज्ञान विकसित करावयाचे होते. १५ ऑगस्ट, १९६९ साली इन्कॉस्पर (INCOSPR) चे नाव बदलून 'भारतीय अंतराळ संशोधन संस्था' (ISRO- Indian Space Research Organization) असे करण्यात आले. भारत सरकारने (Department Of Space) अंतरिक्ष विभागाची स्थापना केली. भारताच्या अवकाश संशोधनाला वेग आला. भारताकडे स्वदेशी Satellite Launch Vehicle नसल्याकारणाने इस्रोने सोव्हिअत युनियनच्या 'इंटरकॉस्मॉस स्पेस प्रोग्राम'च्या मदतीने १९७५ साली भारताचा पहिला कृत्रिम उपग्रह 'आर्यभट्ट' यशस्वीरीत्या अवकाशात प्रक्षेपित केला. यानंतरच्या काळात स्वदेशी उपग्रह प्रक्षेपणासाठी Satellite Launch Vehicle तयार करण्याकडे इस्रोने पावले उचलायला सुरुवात केली.

७ वर्षाच्या कष्टानंतर इस्रोला स्वदेशी उपग्रह प्रक्षेपण स्टेशन (SLV) बनवण्यात यश आले. १९८० साली इस्रोने SLV च्या सहाय्याने रोहिणी सेरीज-१ हा कृत्रिम उपग्रह प्रक्षेपित करून पृथ्वीच्या कक्षेत यशस्वीरीत्या पाठविले. पृथ्वीच्या कक्षेत यशस्वीरित्या उपग्रह पाठविणारा भारत हा जगातून ७ वा देश ठरला. याचे श्रेय शास्त्रज्ञ डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना जाते. या महत्त्वाच्या यशानंतर सुरुवात झाली ती नवीन भारताची. १९७८ च्या सुरुवातीपासूनच इस्रोने Medium Lift Launch Vehicle, Liquid Solid Fuel Rocket Engine च्या निर्मितीसाठी प्रयत्न सुरु केले. इस्रोने टप्याटप्याने अनेक उपग्रह, रॉकेट यशस्वीरीत्या अवकाशात प्रक्षेपित केले. यामुळेच मल्टीबँड कम्युनिकेशन, रडार इमेजिंग, ऑप्टिकल इमेजिंग, हवामानशास्त्रीय उपग्रह पाठविण्यात भारत यशस्वी ठरला. यानंतर १९८२ ते १९९५ या कालावधीत इस्रोने PSLV (Polar Satellite Launch Vehicles) च्या निर्मितीसाठी काम केले. PSLV च्या निर्मितीनंतर अनेक उपग्रहांना पृथ्वीच्या कक्षेत यशस्वीपणे प्रक्षेपित करण्यात आले आणि भारताची तंत्रज्ञानातील प्रगती झपाट्याने होत गेली. या मोठ्या यशानंतर PSLV च्या सहाय्याने २००८ साली चांद्रयान-१ ह्या अवकाशयानाने चंद्रावर यशस्वीरीत्या झेप घेतली आणि चंद्रावर पाण्याचे अस्तित्व आहे हे शोधून काढले. भारताच्या या चांद्रयान-१ मिशनमुळे संपूर्ण जगभरातून भारताचे कौतुक होऊ लागले. जगातील स्पेस प्रोग्रामला एक नवीन दिशा मिळाली.

चंद्राच्या यशस्वी मोहिमेनंतर भारताने मंगळ ग्रह गाठण्यासाठी प्रयत्न सुरु केले. भारत मंगळ मोहीम करणार हे कळताच, 'न्यूयॉर्क टाईम्स'या अमेरिकेतील वर्तमानपत्रात इस्रोच्या मंगलयान मोहिमेवर व्यंगचित्र प्रकाशित केले गेले. पण, भारताने संयम दाखवत २०१४ साली (Mars Orbital Mission-MOM²) मंगलयान मोहीम यशस्वी पार करत अवघ्या जगापुढे एक आदर्श ठेवला. मंगलयान मिशनमुळे भारत पहिल्या प्रयत्नांतच मंगळावर यशस्वीपणे पोहोचणारा जगातील पहिला देश ठरला. २०१७ पर्यंत इस्रोने PSLV मध्ये सुधारणा करत एकूण १०४ उपग्रह पाठवण्याचा विश्वविक्रम केला. त्याचबरोबर (GSLV-Geostationary Satellite Launch Vehicle) च्या निर्मितीमुळे भारताने टेलीकम्यूनिकेशन, टेलीव्हिजन ब्रॉडकास्टिंग, वेदर फॉरकास्टिंग इत्यादी अनेक गोष्टीमध्ये प्रगती केली. इस्रोच्या अंतराळ संशोधनामुळे भारत स्वतंत्र GPS System सुविधा तयार करण्यात सक्षम झाला.

२०१९ साली भारताने दुसरी चंद्रमोहीम चांद्रयान-२ च्या मदतीने प्रक्षेपित केली. परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे चंद्राच्या पृष्ठभागावरून अवघ्या २.१ किलोमीटर उंचीवर असताना चांद्रयान-२ शी संपर्क तुटला आणि दुसऱ्या चांद्रमोहीमेस अपयश आले. २०२३ साली भारताने चांद्रयान-३ साठी प्रयत्न सुरु केले. १४ जुलै रोजी दुपारी २:३५ वाजता श्रीहरीकोटा (आंध्र प्रदेश) मधून प्रक्षेपित करण्यात आले. आता सर्व जगभरात चांद्रयान ३ विषयी चर्चा सुरु होती.

२३ ऑगस्ट, २०२३ चा दिवस उजाडला. वृत्तपत्रापासून ते रेडीओ-टीव्हीपर्यंत त्याच बातम्या कानावर पडत होत्या. चांद्रयान ३ यशस्वीरीत्या चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरले ! चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर जाणारा भारत हा जगातून पहिला देश ठरला! आणि सगळीकडे एकच जल्लोष सुरु झाला... भारताचा सायकलपासून चंद्रावर जाण्याचा प्रवास फार खडतर होता. आत्तापर्यंत भारताने केलेल्या तंत्रज्ञानातील प्रगती आणि अंतराळ संशोधनाची, अवकाशात झेप घेण्याची यशोगाथा अगदी प्रशंसनीय आणि कौतुकास्पद आहे. साधनांची कमतरता असून सुद्धा फक्त प्रबळ महत्वाकांक्षा, सातत्य, कष्ट यामुळेच भारताचे अवकाश संशोधनाचे स्वप्न पूर्णत्वास आले.

**ऋषी चंद्रकात डोंगरे**
बी. एस्सी. भाग ३ (भौतिकशास्त्र विभाग)

## अवकाश मोहिमेत भारताची गरुडभीरारी - आदित्य एल १

आदित्य L1 हे सूर्याचा अभ्यास करणारे पहिले अंतराळ भारतीय मिशन आहे पृथ्वीपासून सुमारे १.५ दशलक्ष किमी अंतरावर असलेल्या सूर्य - पृथ्वी प्रणालीच्या लॅग्रेंज पॉइंट + (L1) भोवती यान हेलो ऑर्बिट मध्ये ठेवले जाईल. L1 बिंदूच्या भोवतालच्या प्रभामंडल कक्षेत ठेवलेल्या उपग्रहाचा मुख्य फायदा आहे की, तो सूर्याला कोणत्याही ग्रहणांशिवाय सतत पाहू शकतो. या कक्षेमध्ये प्रवेश केल्यामुळे सौर क्रियाकलापांचे निरीक्षण करण्याचा आणि रिअल टाइममध्ये अवकाशातील हवामानावर त्याचा परिणाम पाहण्याचा अधिक फायदेशीर ठरू शकते. फोटोस्फियरचे निरीक्षण करण्यासाठी अंतराळयानामध्ये सात पेलोड असतात. इलेक्ट्रोमॅग्नेटिक आणि कण आणि चुंबकीय क्षेत्र शोधकांचा वापर करून क्रोमोस्फियर आणि सूर्याचे बाह्यतम स्तर विशेष व्हँटेज पॉइंट L1 वापरून, चार पेलोड्स थेट सूर्याकडे पाहतात आणि उर्वरित तीन पेलोइस लॅग्रेंज पॉइंट L1 वर कण आणि फील्डचा इन-सीटू अभ्यास करण्यात येईल. आदित्य L1 पेलोड्सचा सूटमध्ये कोरोनल-हीटींग, कॉरोनल मास इंजेक्शन, प्री-फ्लेअर आणि फ्लेअर क्रिया - कलाप आणि त्यांची वैशिष्ट्ये, अवकाशातील हवामानाची गतिशील कण आणि फील्डचा प्रसार इत्यादी समस्या समजून घेण्यासाठी व सर्वात महत्त्वपूर्ण माहिती प्रदान करण्यास उपयुक्त ठरते. सूर्याचे निरीक्षण करण्यासाठी समर्पित केलेले हे पहिले भारतीय मिशन आहे. निगार शाजी या प्रकल्पाच्या संचालक आहेत. आदित्य- L1 हे इस्रोच्या चंद्र मोहिमेच्या यशस्वी लँडिंग २ सप्टेंबर, २०२३ रोजी ११.५० IST वाजता PSLV C57 वर प्रक्षेपित करण्यात आले. दहा दिवसांनी चांद्रयान-३ सुमारे एक तासानंतर याने आपली अभिप्रेत कक्षा यशस्वीरित्या गाठली आणि १२.५७ वाजता चौथ्या कक्षेपासून वेगळे झाले. प्रक्षेपणानंतर साधारण १२७ दिवसांनी तो एल १ बिंदूवर त्याच्या नियुक्त कक्षापर्यंत पोहचण्याचा अंदाज दर्शवला आहे.

**वैज्ञानिक उद्दिष्टे :- आदित्य १-१ ची मुख्य उद्दिष्टे -**

सूर्याच्या कोमोस्फियर आणि कोरोनाच्या गतिशीलतचे निरीक्षण करण्यासाठी क्रोमोस्फिरिक आणि कोरोनल हीटींगचा अभ्यास करण्यासाठी, अंशतः आयनीकृत प्लाझ्माचे भौतिकशास्त्र, कोरोनल मास इंजेक्शन आणि त्यांची उत्पत्ती, कोरोनल चुंबकीय क्षेत्र आणि उष्णता हस्तांतरण यंत्रणा आणि फ्लेअर इक्सचेंज यांची माहिती सूर्यापासून कणांचा गतिशीलतेचा अभ्यासाठी डेटा प्रदान करणारे इन-सीटू कण आणि प्लाझमा वातावरणाचे निरीक्षणं.

सौर-कोरोनाचे भौतिकशास्त्र आणि त्याची गरम यंत्रणा कोरोनल आणि कोरोनल लूप यांचे तापमान, वेग आणि घनता याचे निदान करणे साठी CMES चा विकास, गति-शीलचा आणि मूळ याच्या माहितीसाठी.

अनेक स्तरांवर (क्रोमोस्फियर, बेस आणि विस्तारित कोरोना) घडणाऱ्या प्रक्रियांचा क्रम ओळखण्यासाठी ज्यामुळे अखेरीस सौर उद्रेक घटना घडतात.

सौर कोरोनामध्ये चुंबकीय क्षेत्र टोपोलॉजी आणि चुंबकीय क्षेत्र मोजमाप ठरण्यासाठी. एक संतुलित गुरुत्वाकर्षण स्थान पृथ्वी आणि सूर्य यांना जोडणाऱ्या रेषेच्या अंदाजे लंब असलेल्या विमानात अनियमित आकाराच्या कक्षेत L1 भोवती फिरताना उपग्रह आपले संपूर्ण मिशन आयुष्य घालवतो. चांद्रयान-३ मोहिमेप्रमाणेच पृथ्वीभोवतीची कक्षा तसेच अवकाशयानाचा वेग सूर्याकडे जाईपर्यंत वाढवला जाईल. एल १ पॉइंट पर्यंतचे अंतर जवळपास चार महिन्यांत पूर्ण केले जाईल त्यानंतर हे यान एल १ बिंदूभोवती प्रभामंडल कक्षेत घातले जाईल. ते पाच वर्षाचा डेटा गोळा करेल

**एल-१ बिंदू काय आहे ?**

कोणत्याही दोन प्रदक्षिणा करणाऱ्या खगोलीय पिंडामध्ये एल १ ते एल ५ असे पाच लॅग्रेज बिंदू आहेत. हे बिंदू अंतराळात पार्किंग स्पॉट्स म्हणून काम करू शकतात, जिथे आकाशीय वस्तूंचे गुरुत्वाकर्षण खेचणे उपग्रहाला कक्षेत ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या केंद्राभिमुख बलाच्या बरोबरीचे असते. याचा अर्थ लॅग्रेज पॉइंटसवर ठेवलेल्या उपग्रहांना स्थितीत राहण्यासाठी जास्त इंधन खर्च करण्यासाठी आवश्यकता नाही प्रथम, Lagrange १ ला जाऊन पृथ्वी आणि सूर्य यांच्यामध्ये चंद्राच्या पलीकडे असलेल्या एका बिंदूवर अंतराळयान ठेवले. हे ग्रहणासारख्या घटनेच्या वेळी ही यानाला सूर्याचे अबाधित दृश्य देते. दुसरे, पृथ्वी आणि सूर्यामधील अंतराच्या केवळ १७. मिशनमध्ये, पैलोइस थेट सूर्याकडे पाहण्यास सक्षम असतील. ही स्थिती पेलोड, व्हीएलईसी थेट कोरोनल मास मुख्य इंजेक्शनच्या स्रोताकडे पाहण्यास अनुमती देईल. एकदा एल १ वर आल्यावर, ते सौर कोरोनाचे निरीक्षण करणारे सर्वोतम साधन असेल.

**पेलोड्स :-** भारतीय खगोल भौतिकशास्त्र संस्थेने डिझाइन केलेले- दृश्य उत्सर्जन लाइन कोरोनाग्राफ (VLEC) हा मुख्य पेलोड आहे, जो सर्वात खालच्या भागापासून वरच्या दिशेने सौर कोरोनाचा अभ्यास करण्यास मदत करेल VELC सौर त्रिज्येच्या १.०५ पट खाली सौर कोरोनाची प्रतिमा करु शकते, जे अशा कोणत्याही पेलोडने प्रतिमा घेतलेल्या सर्वात जवळ आहे.

आदित्य - एल १ ची उपकरणे सौर वातावरण, प्रामुख्याने कोमोस्फिर आणि कोरोना यांचे निरिक्षण करण्यासाठी ट्यून केली आहेत. - इन-सीटू उपकरणे एल १ येथील स्थानिक वातावरणाचे निरिक्षण करतील सात पेलोड्स ऑन-बोर्ड आहेत, चार सूर्याच्या रिमोट सेन्सिंगसाठी आणि तीन इन-सीटू निरिक्षणासाठी आहेत. विविध इस्रो केंद्राच्या जवळच्या सहकार्याने देशातील विविध प्रयोगशाळांनी पेलोड विकसित केले आहेत.

इंटर युनिव्हर्सिटी सेंटर फॉर ॲस्ट्रोनॉमी अँड ॲस्ट्रोफिजिक्स (IUC) व्दारे डिझाइन केलेली सोलर अल्ट्राव्हायोलेट इमेजिंग टेलिस्कोप (SUIT) सौर फोटोस्फियर आणि क्रोमोस्फियर-थी युव्ही प्रतिमा कॅप्चर करेल. उत्सर्जित होणाऱ्या प्रकाश ऊर्जेतील फरकाचा अभ्यास करण्यास मदत होईल. यूआर राव सॅटेलाइट सेंटरने विकसित केलेले सोलर लो एनर्जी एक्स-रे स्पेक्ट्रोमीटर आणि हाय एनर्जी एल-१ ऑर्बिटिंग, एक्स-रे स्पेक्ट्रोमीटर, एक्सरे फ्लेअर्सचा अभ्यास करेल. पहिला पेलोड इस्रोच्या भौतिक संशोधन प्रयोगशाळेने आणि नंतरचा पेलोड इस्रोच्या विक्रम साराभाई स्पेस सेंटरच्या स्पेस फिजिक्स प्रयोगशाळेने विकसित केले आहे.

**चैताली पट्टणखुडे,** एम. एस्सी १

## 'भारतीय अवकाश संशोधन'

### अवकाशात झेप घेण्याचे भारताचे स्वप्न पूर्णत्वास



ऋषी डोंगरे
बी. एस्सी. ३

भारताच्या अवकाश संशोधनाचा प्रवास फार खडतर असा होता. स्वातंत्र्योत्तर काळात भारताजवळ अवकाश संशोधनासाठी कोणत्याही पायाभूत सुविधा नव्हत्या. आतापर्यंत भारताने केलेल्या तंत्रज्ञानातील प्रगती आणि अंतराळ संशोधनाची, अवकाशात झेप घेण्याची यशोगाथा अगदी प्रशंसनीय आणि कौतुकास्पद आहे. साधनांची कमतरता असूनसुद्धा फक्त प्रबळ महत्वाकांक्षा, सातत्य, कष्ट यामुळेच भारताच्या डोळ्यांतील स्वप्न पूर्णत्वास आले.

### 'अंतराळ संशोधनात महिलांचा सहभाग !'



वैष्णवी परिट
बी. एस्सी. ३

वैज्ञानिक क्षेत्रामध्ये महिलांचीसुद्धा कामगिरी उल्लेखनीय आहे. भारताची पहिली अंतराळ वीरांगना म्हणजे कल्पना चावला. त्यांनी नवीन पिढीसाठी एक आदर्श ठेवला आहे. सध्याच्या माहितीनुसार इस्रोमध्ये २२% महिला संशोधक कार्यरत आहेत. यावरून आपल्या हे लक्षात येते की, महिलादेखील अंतराळ संशोधनामध्ये मागे नाहीत. 'मुलगी शिकली प्रगती झाली' या उक्तीप्रमाणे देशाच्या यशस्वीतेसाठी महिलांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

### 'साइकल से चांद तक !'



संदेश जाधव
बी. एस्सी. ३

अनेक समस्यांचा सामना करत भारताने भास्कर-१, कल्पना-१, चांद्रयान, मंगळयान, आदित्य-L1 यांसारखे अनेक मोहिमा यशस्वीरीत्या पार पाडल्या. 'साइकल से चांद तक' ही उपमाच भारतीय अवकाश संशोधनातील भारताची प्रगती सांगून जाते. जगभरातून भारतीय अंतराळ संशोधनाला एक उच्च दर्जा लाभला आहे. इथून पुढेही भारताच्या अंतराळ संशोधनाचे कार्य अविरतपणे सुरू राहील अशी खात्री आहे !

### 'भारताच्या अवकाश संशोधनातील प्रगती प्रशंसनीय'



साक्षी कोळी
बी. एस्सी. ३

भारताने पहिल्या प्रयत्नातच मंगळावर भारताचा तिरंगा फडकावला आहे. तसेच चांद्रयान-३, मंगळयान सारखे आनंदाचे क्षण भारतीय अवकाश संशोधनामुळे लाभले आहेत. या यशामागे अनेक थोर शास्त्रज्ञांचे, संशोधकांचे अथक परिश्रम आहेत, हे आपण विसरता कामा नये. भारतीय अवकाश संशोधनाचा प्रवास प्रशंसनीय आहे.

### 'इस्रोची आदित्य एल-१ मोहीम'



साहिल पाटणेकर
बी. एस्सी. २

चांद्रयानच्या यशस्वी मोहिमेनंतर अलीकडेच इस्रोने सूर्याचा अभ्यास करण्यासाठी आपले पहिले अंतराळ आधारित मिशन 'आदित्य L1' प्रक्षेपित केले. या प्रोबमध्ये सात पेलोड आहेत जे सूर्य, अवकाश आणि आजूबाजूच्या परिसराचा मोठ्या प्रमाणावर अभ्यास करतील! आगामी वर्षात इस्रो अवकाश संशोधनात मोठी भूमिका बजावेल!

### 'इस्रोमध्ये मराठी तरुणाची शास्त्रज्ञ म्हणून निवड'



निहाल सय्यद
बी. एस्सी. १

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेत महाराष्ट्रातून तरुणांचा देखील सहभाग दिसत आहे. पंढरपूर तालुक्यातील सरकोली येथील सोमनाथ नंदू माळी या युवकाची केरळमधील तिरुअनंतपुरमच्या 'विक्रम साराभाई स्पेस सेंटर' मध्ये वरिष्ठ शास्त्रज्ञ म्हणून निवड झाली. ही खरच कौतुकास्पद गोष्ट आहे की, मराठी तरुणदेखील भारताच्या अंतराळ संशोधनाचा एक भाग आहेत.

### 'अंतराळ संशोधनाचा भारतीय अर्थव्यवस्थेला फायदा'



भारताच्या अवकाश संशोधनातील प्रगतीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला देखील फायदा होत आहे. आपण दुसऱ्या देशाचे उपग्रह आपल्या रॉकेटद्वारे प्रक्षेपित करून देतो यामुळे आपल्याला आर्थिक फायदा होतो. नासापेक्षा कितीतरी पटीने कमी खर्चात इस्रो अंतराळ मोहिमा करते.

सुशांत सुतार बी. एस्सी. ३

### 'देशाच्या प्रगतीसाठी अंतराळ संशोधन महत्त्वाचे'



भारताने स्वातंत्र्योत्तर काळात विज्ञान, तंत्रज्ञान आणि अंतराळ संशोधनात खूप प्रगती केली आहे. भारताच्या याच अंतराळ मोहिमेद्वारे आपण सध्याच्या युगात जी कम्युनिकेशनसाठी तंत्रज्ञानाची साधने वापरत असतो हे सर्व अवकाश संशोधनामुळेच शक्य झाले आहे. एकंदरीत देशाच्या प्रगतीसाठी अंतराळ संशोधन महत्त्वाचे आहे.

सौरभ मेटकरी बी.एस्सी. ३

### 'अंतराळ संशोधनामुळे भारतीय संरक्षण क्षेत्र सुदृढ'



भारतीय संरक्षण क्षेत्राला सुदृढ करण्याचे काम याच अवकाश संशोधनामुळेच झाले आहे. भारताने स्वतःची नेविगेशन जीपीएस सिस्टीमची निर्मिती केली. यामुळे डिफेन्समध्ये शत्रूवर नजर ठेवण्यासाठी आणि देशाच्या संरक्षणासाठी या अंतराळ संशोधनाची मदत झाली आहे. देशाच्या प्रगतीसाठी ही खूप मोठी उपलब्धी आहे.

सुदर्शन पाटील बी. एस्सी ३

* मार्गदर्शक : मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे, * प्रकाशक व प्रमुख संपादक : प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, * सहसंपादक : डॉ. प्रदीप पाटील, डॉ. स्वप्निल बुचडे , श्री. सदानंद दुर्गुळे * सहाय्यक संपादक : गुलनाज पठाण बी.ए.-२, प्रणव पाटील बी.ए.-२, संग्राम राठोड बी.ए.-३, कोमल पाटील बी.ए.-३, सानिका नाकिल बी.ए.-३, प्रतिक्षा पोवार बी.ए.-३, प्रज्ञा पाटील बी.ए.-३ * मुरारी प्रिंटींग सर्व्हिसेस, कोल्हापूर येथे छापून विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथून प्रसिद्ध केले. * फोन :(०२३१)२५४३४०२. * या अंकात छापलेल्या मजकुरांशी संपादक/प्रकाशन सहमत असतीलच असे नाही. (फक्त खाजगी वितरणासाठी)

## विवेकानंद कॉलेजमध्ये संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे पुण्यतिथी निमित्त अभिवादन



संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांनी सामान्यपण जपत असामान्य कर्तृत्व केले. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्यासारख्या थोर विभुतीबरोबर संसार करताना गरिबी, अडचणी आणि आव्हाने यांच्याशी दोन हात करीत संस्थेच्या प्रसार आणि विस्तारासाठी सारे आयुष्य वेचले. कुटुंब, संस्था, गुरुदेव कार्यकर्ते यांच्याशी स्नेहभावाने व आईच्या मायेने त्यांनी प्रेम केले. प्रत्येक गुरुदेव कार्यकर्त्याला आपल्या परिवारातील समजणाऱ्या आणि त्यावर लेकरा-सारखी माया पांघरणारी संस्थामाता खऱ्या अर्थाने समर्पित आयुष्य जगल्या, असे मत प्रा. शिल्पा भोसले यांनी मांडले. संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या १० व्या पुण्यतिथी निमित्त आयोजित संस्थामाता वैचारिक जागर कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी प्रा.गीतांजली साळुंखे यांनी संस्थामाता सोबतच्या लहान-पणीच्या आठवणींना उजाळा देत संस्थामातेंच्या संस्काराचा आमच्या जीवनामध्ये महत्वाचा वाटा आहे असे विचार मांडले. पुण्यतिथी अभिवादन कार्यक्रम विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार यांच्या मार्गदर्शना-खाली संपन्न झाला. याप्रसंगी संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन प्रा. एम. ए. कुरणे यांच्या हस्ते करणेत आले. आभार प्रा.एस.एस. अंकुशराव यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. कैलास पाटील यांनी केले. यावेळी ज्युनिअर, सिनि. कॉलेजचे प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विवेकानंदमध्ये विद्यार्थिनींकरीता जागरुकता कार्यक्रमाचे आयोजन

येथील विवेकानंद महाविद्या-लयांतर्गत तक्रार समिती व शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनींकरीता जागरुकता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात शहाजी लॉ कॉलेजच्या प्रा. किर्ती पवार व डॉ. अस्मिता पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. अस्मिता पाटील यांनी पोस्पो कायदयाविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. प्रा.किर्ती पवार यांनी कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक शोषणाविरोधी कायदा तसेच घरगुती हिंसाचार विरोधी कायद्या-विषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, संवाद साधणे खूप महत्वाचे आहे. त्यातून मार्ग निघतात. सदरच्या कार्यक्रमात व्हिडीओ क्लीपव्दारे माहिती देण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. उर्मिला खोत यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा वर्षा पवार यांनी करुन दिला. आभार डॉ नीता पाटील यांनी मानले. सुत्रसंचालन प्रा. सतीश उपळावीकर यांनी केले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थिनी व महिला प्राध्यापिका बहुसंख्येने उपस्थित होत्या.

## विवेकानंद कॉलेजमध्ये राष्ट्रीय वन्यजीव सप्ताह साजरा



वन्यजीव हे जैवविविधतेते अविभाज्य घटक असून त्यांचे मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे. नामशेष होत चाललेल्या वन्य पशुपक्ष्यांबाबत जागृती निर्माण करण्यासाठी विवेकानंद कॉलेजच्या प्राणीशास्त्र विभागांतर्गत १ ते ७ सप्टेंबर २०२३ दरम्यान 'राष्ट्रीय वन्यजीव सप्ताह' साजरा केला गेला. या सप्ताहाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले.

या सप्ताहामध्ये विविध स्पर्धांचे आयोजन केले गेले. यामध्ये रांगोळी स्पर्धेसाठी २३, फोटोग्राफीसाठी २४, क्राफ्ट ॲण्ड मॉडिल १२, पोस्टर्स २२, निबंध २१, वक्तृत्व ९, शॉर्ट फिल्मसाठी १२, प्रश्नमंजूषा ५१, हॅण्ड ण्ड फेस पेंटींगसाठी २२ असे एकूण १९६ विद्यार्थ्यांनी उस्फूर्त सहभाग दर्शवला. बी.एस्सी.भाग-१, २ व ३ वर्गाच्या १६ विद्यार्थ्यांनी 'वन्यजीव संरक्षण आणि संवर्धन' या विषयांवर मध्यवर्ती बसस्थानक, रंकाळा बसस्थानक, बिंदू चौक या ठिकाणी पथनाट्य सादर केले.

या सप्ताहानिमित्त 'वन्यजीव संवर्धनाचे महत्व' विषयावर श्री.रोहन भाटे शाह यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. यामध्ये त्यांनी कोयना आणि पश्चिम घाटातील जैवविविधतेची माहिती दिली. तसेच खवल्या मांजर, बिबट्या यांसारख्या प्राण्यांच्या तस्करीबाबत खंत व्यक्त केली. त्यांनी केलेल्या रेस्क्यू ऑपरेशनची माहिती दिली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून महाविद्या-लयाच्या IQC समन्वयक डॉ.श्रुती जोशी लाभल्या. वन्यजीव सप्ताहातील विजेत्यांना डॉ.श्रुती जोशी यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. कार्यक्रमाचे नियोजन प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ.जी.के. सोनटक्के यांनी केले. प्रस्तावना डॉ.टी.सी.गौपाले यांनी केली. सूत्रसंचालन डॉ.टी.सी.पाटील यांनी केले. डॉ.एस.एस.देसाई यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमासाठी बी.एस्सी.१, २ व ३ मधील विद्यार्थी उपस्थित होते. यामध्ये विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## विवेकानंद कॉलेजची कु. ज्ञानेश्वरी पाटील हिची नॅशनल चॅम्पियनशीपमध्ये अव्वल कामगिरी



विवेकानंद कॉलेजमधील एम.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स -१ या वर्गातील कु. ज्ञानेश्वरी जयवीर पाटील हिने दिल्ली येथे दि. १५ नोव्हें. ते २ डिसें.२०२३ या कालावधीमध्ये झालेल्या ६६ व्या नॅशनल शुटिंग चॅम्पीयनशीप स्पर्धेत १ सिल्व्हर, २ ब्रॉण्झ पदकांची कमाई करून घवघवीत यश संपादन केले. या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी मा. प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, संस्था सी.ईओ. श्री कौस्तुभ गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी तिचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

कु. ज्ञानेश्वरी पाटील हिला जिमखाना प्रमुख प्रा.हवलदार एन.आर.सणगर, प्रा सहिदा कच्छी, प्रा संतोष कुंडले, प्रा समिर पठाण यांचे बहुमोल मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले. या यशाबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## विवेकानंदमध्ये पर्यावरणपूरक दसरा साजरा



दसरा हा पारंपरिक सणांपैकी एक सण. हा दिवस वाईट गोष्टींवर चांगल्या गोष्टींचा झालेला विजय आणि या विजयाप्रित्यर्थ साजरा केला जाणारा दिवस म्हणजे दसरा. दसऱ्या दिवशी आपण आपट्याची पाने वाटतो. ही पाने हाती सोपवत असताना सोने घ्या, सोन्यासारखे राहा अशा शुभेच्छा देतो. दसरा निमित्ताने अलीकडील काळात आपट्याबरोबर कांचन, सुवर्णकांचन इ. झाडांची बेसुमार तोड होत आहे. परिणामी त्यांची संख्या कमी होत चालली आहे. बेसुमार तोडलेल्या पानांचे कचऱ्यांमध्ये रुपांतर होते. काही जण तर आपट्यांच्या पानांना जाळून टाकतात. एक झाड म्हणजे जैवविविधतेचे भांडार असते. अशा जैवविविधतेच्या भांडाराचे संवर्धन व जतन करण्यासाठी यावर्षी दसऱ्याचे औचित्य साधून विवेकानंद महविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागात पर्यावरणपूरक दसरा साजरा करण्यात आला. आपट्याच्या झाडाच्या पानांऐवजी रद्दी पेपर, जुन्या लग्नपत्रिका, जुनी भेट कार्ड व नैसर्गिक रंगाचा वापर करुन आपट्याच्या पानाच्या आकाराची पर्यावरणपूरक पाने तयार केली असून त्यावर पर्यावरण व वृक्ष संवर्धनाचे संदेश लिहिले आहेत. या पानांचे वैशिष्ट्य म्हणजे पान बनवताना त्यामध्ये वापरण्यात आलेल्या वेगवेगळया प्रकारच्या बिया. ही पाने कुठेही पडली तरी त्यामधून नवीन झाडेच तयार होतील. पारंपारिक सणांची कास धरुन पर्यावरणपूरक सण साजरे करुन जनजागृती व्हावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे उदघाटन गणित विभागप्रमुख प्रा. एस. पी. थोरात यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांनी केले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी सृष्टी कांबळे व आराधना मराठे यांनी केले.

## विवेकानंदमध्ये पारंपरिक वेशभूषा दिन उत्साहात संपन्न



कोल्हापूर दि.१० विवेकानंद कॉलेज मध्ये सांस्कृतिक विभागाच्या वतीने पारंपरिक वेशभूषा दिनाचे आयोजन करण्यात आले होते. कोरोना काळानंतर प्रथमच या पारंपरिक वेशभूषा दिनाचे आयोजन करण्यात आले होते त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभूतपूर्व उत्साह आणि चैतन्य संचारले होते. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी विविध पारंपरिक वेशभूषा परिधान करुन आले होते.

याप्रसंगी सांस्कृतिक विभागाच्या वतीने विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार यानी केले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध भाषेतील गीतांचे बहारदार सादरीकरण केले. तसेच यावेळी विविध वादये, नृत्य, सामुहिक नृत्य, शिवाजी विद्यापीठ युवा महोत्स्व मधील विजेत्या संघाचे धनगरी लोकनृत्य सादर करण्यात आले. सदरचा कार्यक्रम पर्यावरणपूरक वातावरणात अत्यंत शिस्तबध्दरित्या पार पडला. या कार्यक्रमाचे संयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. आरिफ महात व सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांनी केले होते.

सूत्रसंचालन कु. निहाल रुकडीकर यानी केले तर आभार प्रा.संदीप पाटील यांनी मानले.

## प्रसार माध्यमाचे फायदे तोटे या विषयावर गटचर्चा



प्रसारमाध्यमाची भूमिका आणि त्याचे समाजावर होणारे फायदे तोटे या विषयावर समाजशास्त्र विभागात गटचर्चेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी प्रसार माध्यमाच्या चुकीच्या वापरामुळे लोकांची खूप मोठी फसवणूक होते तर काही वेळा प्रसारमाध्यमाचा योग्य वापर केला तर अनेकवेळा समाजात होणारी फसवणूक टाळू शकतो. इंटरनेट, मोबाईलचा वापर यामुळे माणसामाणसातील संबंध हे कमी होऊ लागले अशा पद्धतीची चर्चा यावेळी झाली. त्याचबरोबर काही विद्यार्थी म्हणाले की, सोशल मिडिया मुळे वाचन संस्कृती ही कमी होत असताना दिसून येत आहे. प्रसार माध्यमामुळे जगाच्या एका टोकाला घडलेली घटना ही तात्काळ आपल्याला समजू शकते. त्यामुळे जगातील घडामोडी सहजपणे आपल्याला घरबसल्या सोशल मीडियाच्या वापरामुळे समजतात. प्रसार माध्यमामुळे माणूस सतर्क होऊ लागला आहे. चुकीची होणारी घटनाही टाळता येऊ शकते. त्यामुळे प्रसारमाध्यमाचा वापर काही वेळेला फायदेशीर आहे. अशा पद्धतीचे विचार काही विद्यार्थ्यांनी मांडले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार आणि डॉ. श्रुती जोशी यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे नियोजन समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. एच. व्ही. चामे यांनी केले तर प्रा. आर्या पाटील यांनी आभार मानले.

## विवेकानंदच्या तीन खेळाडूंना शिवाजी विद्यापीठाची क्रीडा शिष्यवृत्ती



कोल्हापूर दि. ०४ : येथील विवेकानंद कॉलेजच्या खालील तीन खेळाडूंना सन २०२२-२३ ची शिवाजी विद्यापीठ क्रीडा विभागाची प्रत्येकी रुपये २०,०००/-शिष्यवृती मिळाली आहे. यामध्ये बी. ए. भाग १ मधील विद्यार्थिनी हर्षदा हणमंत पाटील, सृष्टी तात्यासाहेब कोणुरी, श्रेया राजगोंडा पाटील यांचा समावेश आहे. या यशाबद्दल वरील खेळाडूंचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार यांनी अभिनंदन केले. या खेळाडूंना जिमखाना विभागातील प्रा. हवलदार एन.आर.सणगर, प्रा.सहिदा कच्छी, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले. त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## विवेकानंदमध्ये वाणिज्य व व्यवस्थापन क्षेत्रामधील रोजगार संधी विषयावर व्याख्यान व पुस्तक प्रकाशन



विद्यार्थ्यांनी तरुण वयातच ध्येय निश्चिती करणे आवश्यक आहे. स्वत:ला सिध्द करण्यासाठी स्वत:च्या क्षमता, मर्यादा, संधी आणि आव्हाने ओळखणे गरजेचे आहे. त्यासाठी जवळचे मित्र, आई वडील, बहिणभाऊ, समाज यांची मदत घेऊ शकतात. जिद्द, चिकाटी, परिश्रम आणि आत्मविश्वास यांच्या बळावर विद्यार्थी निश्चितच यश मिळवू शकतात. आजच्या या संघर्षाच्या काळात विद्यार्थ्यांनी पदवीच्या शिक्षणाबरोबरच अधिकचे कौशल्याधारित शिक्षण घेणे महत्त्वाचे आहे. वाणिज्य व व्यवस्थापन क्षेत्रामध्ये बँकींग, फायनान्स, इन्शुरन्स, टॅक्सेशन, शेअर मार्केट, फॉरेन्सिक अकाऊंटींग, व्हॅल्यूअर, क्चयुरी, मॅनेजमेंट अकौटींग इ. क्षेत्रामध्ये रोजगाराच्या प्रचंड संधी उपलब्ध असून त्यासाठी आपण सदैव तत्पर असणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. ते वाणिज्य व व्यवस्थापन विभाग आणि करिअर गायडन्स सेलच्या वतीने आयोजित केलेल्या व्याख्यानात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार हे होते.

याप्रसंगी विवेकानंद कॉलेजच्या वाणिज्य विभागातील प्रा. डॉ. योगेश माने व प्रा.उदय महेकर लिखित कॉर्पोरेट अकाउंटिंग या ग्रंथाचे प्रकाशन प्रमुख पाहुणे डॉ. श्रीकृष्ण महाजन व प्राचार्य डॉ.आर.आर. कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून या ग्रंथाचे महत्व अधोरेखित केले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. आर.आर.कुंभार यांनी वेळेचे महत्व ओळखून विद्यार्थ्यांनी स्वत:ला सिध्द केले पाहिजे. या वयात विद्यार्थ्यांनी कष्ट घेऊन रोजगार मिळणेसाठीचे आवश्यक ते कौशल्याधारित शिक्षण घेतले तरच ते आयुष्यात यशस्वी बनतील. असे मत मांडले.

